# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./१२०२/२०२२ दि. ०४/०५/२०२२

## सुचनापत्र

विषय :- "राष्ट्रीय सेवा योजना कक्षाकरीता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी" हे पद भरण्याबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र. इएसट-४४१५/प्र.क्र.३७७/आस्था-१, दि. २५/०३/२०२२.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रानुसार राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पदाची पात्रता संदर्भिय पत्रामध्ये नमुदप्रमाणे निर्धारित केलेली आहे.

करीता सर्व संबंधित इच्छुक व पात्र उमेदवारांनी संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे व **"मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५"** या पत्यावर संपुर्ण दस्ताऐवज संलग्न करुन (शैक्षणिक प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणत्र व इतर तत्सम दस्ताऐवज) उपरोक्त पदासाठी विनाविलंब आवेदन करावे.

संलग्न - वरीलप्रमाणे

4.5.2022

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. सर्व प्रशासकीय / शैक्षणिक विभागांचे मा. विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर सुचनापत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
७. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)** 4.5.2022
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 1365 दि. 30/04/22
जावक क्र. ......... दि. .........

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार इमारत, दालन क्र.४३७,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.

दूरध्वनी क्र .०२२ २२७९३९१४.
Email ID : astha१.hted-mh@gov.in

---

**क्रमांक : इएसटी-४४१५/प्र.क्र.३७७/आस्था-१.** दिनांक : २५ मार्च,२०२२

प्रति,

१.संचालक (उच्च शिक्षण),
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व विद्यापीठांचे कुलसचिव.

विषय : "राष्ट्रीय सेवायोजन कक्षाकरीता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी" हे पद भरण्याबाबत.

महोदय,

राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पदाची पात्रता खालीलप्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केलेली आहे:-

१. He/She should have served as programme Coordinator in the University or Programme Officer in a college at least for four years continuously.
२. He/She should possess the academic qualifications for being appointed as programme Coordinator as prescribed by the Ministry of Youth Affairs and sports, Government of India.
३.He/She should have interest in Youth Work in particular and social work in general.

2. तसेच इतर अटी खालीलप्रमाणे आहे:-

अ). संपर्क अधिकारी हे पद सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) (सुधारित वेतनश्रेणी रु.१३१४००-२१७१००/-) या संवर्गातील राहील.

ब) त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व असावे.



DR(ESH) issue notification
29.4

सोपवले
30.4.2022

क) पात्र उमेदवारांची प्रतिनियुक्तीने वा कंत्राटी पध्दतीने प्रथमत: एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल आणि त्यानंतर त्या व्यक्तीच्या कामाचा आढावा घेऊन मुदतवाढ देता येईल.

ड) पात्र उमेदवाराची नियुक्ती मंत्रालयीन आस्थापनेवर असेपर्यंत त्याला शिक्षण विभागाच्या दीर्घ मुदतीचे रजेचे नियम लागू न होता सर्वसाधारण शासकीय कर्मचाऱ्याचे रजेचे नियम लागू होतील .

इ) पात्र उमेदवाराची नियुक्ती प्रतिनियुक्ती पध्दतीने जरी होत असली तरीही त्याची सेवा स्वीयेत्तर( Foreign Services) समजली जाणार नाही .आणि म्हणून त्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा प्रतिनियुक्ती भत्ता (Deputation Allowance) अनुज्ञेय राहणार नाही. फक्त वर दिलेल्या वेतनश्रेणीत महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार त्यांचे वेतन नियमित केले जाईल .

ई)पात्र उमेदवाराला राष्ट्रीय सेवायोजनेसंबंधी सर्व प्रकारची प्रशासकीय कामे, विद्यापिठांना वेळेवर अनुदान मंजूर करणे, मंजूर केलेल्या अनुदानाचे लेखा परिक्षण करणे आणि केंद्र शासन विभागीय केंद्र पुणे आणि राज्यातील सर्व विद्यापीठांशी योग्य समन्वय साधावा लागेल .तसेच राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीचा पदसिध्द सदस्य म्हणून प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या बैठकीस उपस्थित रहावे लागेल व वेळोवेळी निर्देशित केलेली कामे पार पाडावी लागतील.

फ) पात्र उमेदवार मुंबई बाहेरील असल्यास त्याला स्वत:ला त्याच्या निवासस्थानाची व्यवस्था करावी लागेल . त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही .

३. वरील अटी विचारात घेऊन राज्यातील पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवावेत. त्याकरीता वर्तमानपत्रांतही जाहिरात देण्यांत यावी. विद्यापीठांनी त्यांचेकडील अर्ज संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडे एकत्रित पाठवावे. संचालकांनी विद्यापिठांकडून प्राप्त झालेले अर्ज व त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन व उमेदवारांची नावे त्यांच्या संपूर्ण तपशिलासह (Bio-Data) तसेच गोपनीय अभिलेखासह शासनाकडे आपल्या शिफारशींसह पुढील कार्यवाहीसाठी सादर करावे.

या संदर्भातील कार्यवाही तात्काळ करावी व अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

द.रा.कहार

(द.रा.कहार)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

राष्ट्रीय सेवा योजनाए